जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2020

तरुण भारत

# प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा शाहिरी कलेने जिवंत ठेवला

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठात शाहिरी प्रशिक्षण शिबिराची सांगता

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्राला शाहिरीचीं प्राचीन परंपरा आहे. शाहिरी कला ही मानवी जीवनात रसनिर्मितीचे सामर्थ्य निर्माण करते. प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा जिवंत ठेवण्यात शाहिरी कलेने मोठे योगदान दिले असून ही कला जोपासाने काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठातील अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्यावतीने वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये शाहिरी प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शाहीर राजू राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : राज्य सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि शिवाजी विद्यापीठातील अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्यावतीने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगताप्रसंगी पोवाडा सादर करताना शाहीर.

'थाफ डफावर मार शाहिरा' या प्रात्याक्षिकाचे सादरीकरण केले. सहभागी प्रशिक्षणार्थीनी छत्रपती शिवाजी महाराजांसह लोकनायकांना नमन करून कार्यक्रमाची सुरूवात केली. यावेळी कलर्स मराठी वाहिनीवरील गायक राजू नदाफ याने 'मल्हारवारी मोतीयाने धावी भरून' या गीताचे सादरीकरण केले.

प्रशिक्षणार्थी महेश सोनुले व सहकाऱ्यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली', 'माझ्या जीवाची होतीया काहिली' हे गीत सादर केले तर शाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीस मुजरा केला. शाहीर भारती कोळेकर व सहकाऱ्यांनी जागा झालाय समाज आज, मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं हा पोवाडा, माधवी काटकर यांनी 'वीर मर्द झाशी' की राणी हा पोवाडा सादर केला. प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. आभार डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानले.



**कोल्हापूर : शिवजयंतीनिमित्त विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासमवेत अन्य अधिकारी.**

# विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शिवजयंती मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. तत्पूर्वी, मान्यवरांनी शिवप्रतिमेचे पूजन केले. राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी भवनच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या झांज, ढोल-ताशा व लेझीम पथकांनी नेत्रदीपक कलेचे सादरीकरण केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला मान्यवरांनी पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, गजानन पळसे, डॉ. पी. डी. राऊत आदी उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमानंतर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये संत रविदास यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

# शाहिरी कला प्रबोधनाचे प्रभावी माध्यम

## डॉ. डी. टी. शिर्के; शाहिरी प्रशिक्षण शिबिर सांगता समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राला शाहिरीची प्राचीन परंपरा आहे. शाहिरी कला ही मानवी जीवनात रसनिर्मितीचे सामर्थ्य निर्माण करते. प्रबोधनात्मक परंपरेचा वारसा जिंवत ठेवण्यात शाहिरी कलेने मोठे योगदान दिले असून ही कला जोपासणे काळाची गरज असल्याची भावना प्र. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांनी केले.

राज्य सांस्कृतिक कार्य संचलनालय व अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व शाहीर राजू राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

'थाफ डफावर मार शाहिरा' या प्रात्याक्षिकाचे सादरीकरण झाले. सहभागी प्रशिक्षणार्थीनी छत्रपती शिवाजी महाराजांसह लोकनायकांना नमन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी गायक राजू नदाफ यांनी 'मल्हार वारी मोतीयाने द्यावी भरून' हे गीत सादर केले. प्रशिक्षणार्थी महेश सोनुले व सहकाऱ्यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली माझ्या जीवाची होतीया काहिली' हे गीत सादर करीत शाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरीस मुजरा केला. शाहीर भारती कोळेकर व सहकाऱ्यांनी 'जागा झालाय समाज आज, मुलगी जन्माला येता घरात सुख वाटाया लागलं' हे, तर शाहीर माधवी काटकर यांनी 'वीर मर्द झाशी की राणी' हा पोवाडा सादर केला. यावेळी भेदिक शाहिरी, 'शिवरायांचा गोंधळ', 'महाराष्ट्राचे शाहीर आम्ही' व 'जग बदल घालुनी घाव' आदी पोवाड्यांचे सादरीकरण झाले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभप्रसंगी कलेचे सादरीकरण करताना शाहीर व त्यांचे सहकारी.



शिवाजी विद्यापीठातून...

# भाषा संस्कृतीचे रंग घेऊन येते

## कृष्णात खोत; मातृभाषा दिनानिमित्त व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भूमी आणि मातृभाषेचा जवळचा संबंध असतो. मातृभाषेतून अस्सलता प्रकटत असते. त्यामुळे भाषा समाज संस्कृतीचे रंग घेऊन अवतरत असते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कादंबरीकार कृष्णात खोत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात मातृभाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. खोत यांनी आपल्या विविध कादंबऱ्यांमधून आलेले बोली भाषेतील शब्द व त्यामागील सामाजिक, भौगोलिक पार्श्वभूमी स्पष्ट करून सांगितली. याप्रसंगी विष्णू वासुदेव यांनी 'पारोशी' या भटक्या समाजाच्या बोलीभाषेबद्दल मांडणी केली. ठराविक समूहामध्ये संकेतभाषा म्हणून बोलल्या जाणाऱ्या भाषेचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. रमेश साळुखे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मण साठे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मातृभाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ कादंबरीकार कृष्णात खोत. सोबत डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. रमेश साळुखे आदी.**

# विद्यापीठाचे विविध पेटंटवर 'स्वामित्व'


**Appasaheb.mali**
@timesgroup.com
Tweet : Appasaheb_MT


**कोल्हापूर :** विविध विषयातील संशोधनाला चालना देताना शिवाजी विद्यापीठाने आता त्या संशोधन विषयातील पेटंटमध्ये (स्वामित्व हक्क नोंदणी प्रक्रिया) अव्वल स्थान गाठले आहे. गेल्या दोन वर्षांत विद्यापीठाकडून ३१ विषयांवर आधारित पेटंट प्रकाशित झाली आहेत. तीन विषयाचे पेटंट तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहेत. राज्यातील अकृषी विद्यापीठात वर्षभराच्या कालावधीत इतक्या मोठ्या संख्येने संशोधन प्रकल्पाअंती स्वामित्व हक्क मिळवणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव आहे. शिवाय हे सगळे पेटंट भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित होण्याचा वेगळा बहुमानही विद्यापीठाला मिळाला आहे. आता पेटंटच्या मान्यतेची केवळ औपचारिकता शिल्लक असल्याचा दावा विद्यापीठातील प्राध्यापक वर्गाचा आहे.

हे सगळे पेटंट बाजारपेठेत उत्पादनाच्या स्वरुपात आणण्यासाठी प्रशासनाकडून काम सुरू आहे. नजीकच्या काळात प्राध्यापकांचे संशोधन 'प्रयोगशाळा ते बाजारपेठ'या सुत्रानुसार लोकांपर्यंत पोहचेल. पेटंटमुळे विद्यापीठाला रॉयल्टी उपलब्ध होवून शैक्षणिक कार्याला चालना देण्याची प्रक्रिया घडते.' विद्यापीठाचे प्रकाशित पेटंट कॅन्सर प्रतिबंधित रसायने, बॅटरी उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता, मधुमेहावर औषध निर्मिती, सौरऊर्जा घट, सूक्ष्मद्रव्यांचा उष्णता वहनासाठी उपयोग, अन्न प्रक्रिया, बिग डेटा अॅनेलिटिक्स, सॉफ्ट कम्प्युटिंग या विषयांशी निगडीत आहेत. कम्प्युटर सायन्स, तंत्रज्ञान विभाग, रसायनशास्त्र विभाग, वनस्पतीशास्त्र विभागासह अन्य विभागांचा यामध्ये समावेश आहे.

'स्वामित्व हक्क'विषयी बोलताना डॉ. गजानन राशिनकर म्हणाले, 'नाविन्यपूर्ण संशोधन करायचे, स्वामित्व हक्क मिळवायचे आणि त्या माध्यमातून स्टार्ट अप सुरू करायचा हा सध्याचा ट्रेंड आहे. रॉयल्टीतून विद्यापीठाला मिळणाऱ्या महसूलामधून उच्च शिक्षणासाठीच्या खर्चाचे नियोजन आहे.' दरम्यान ३१ पैकी कम्प्युटर सायन्स विभागाचे ११ पेटंट आहेत. या विषयात पेटंट मिळण्याची उदाहरणे कमी आहेत. कारण सॉफ्टवेअर विषयात पेटंट मिळत नाहीत. त्यासाठी सॉफ्टवेअर हे हार्डवेअरचा भाग असल्याचे दाखवावे लागते. कॅम्पुटर सायन्समधील या क्लिष्ट विषयाची मांडणी सूत्रबद्धपणे करत मोठ्या संख्येने पेटंट प्रकाशित केले आहे. विभागाचे प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या नावाखाली त्याची नोंद झाली आहे.



## दीड वर्षात ३१ पेटंट प्रकाशित

> पेटंट लिहिण्याची प्रक्रिया किचकट आहे. त्यामध्ये संशोधन विषयाची व कायदेशीर माहिती समाविष्ट करावी लागते. पेटंटमुळे प्राध्यापक व विद्यापीठाच्या संशोधनावर स्वामित्व हक्क नोंदणी होते. परवानगीशिवाय ते अन्य कुणालाही वापरता येत नाही.
>
> -डॉ. शिवाजी सादळे, तंत्रज्ञान विभाग

## या प्राध्यापकांचे योगदान

विद्यापीठातील काही प्राध्यापकांनी व्यक्तीगत स्वरुपात तर काहींनी अन्य विद्यापीठातील प्राध्यापकांसोबत संशोधन करुन पेटंट प्रकाशित केले आहेत. यामध्ये तंत्रज्ञान विभागातील डॉ. ए. के. साहू, डॉ. आर. सी. रणवीर, प्रो. पी. एस. पाटील, डॉ. ए. सी. लोखंडे व प्रो. जयदीप बागी, डॉ. एस. बी. चव्हाण, डॉ. संजय कोळेकर, डॉ. ए. ए. गाताडे, डॉ. जी. एस. राशिनकर व डॉ. पी.ए. बनसोडे, डॉ. डी. के. गायकवाड, एस. एम. भोसले, डॉ. यू. एल. बोंबळे, डॉ. आर. के. कामत, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. शिवाजी सादळे, डॉ. के. जी. खराडे आदींचा समावेश आहे. काही प्राध्यापकांनी कोरियातील प्राध्यापकांसोबत मिळून पेटंटसंबंधी काम केले आहे.

## विद्यापीठाची भूमिका

- २०१८ पर्यंत विविध विभागातील प्राध्यापकांकडील पेटंटची संख्या ४९
- प्राध्यापकांच्या संशोधनाला चालना व जास्तीत जास्त पेटंटसाठी विद्यापीठाकडून प्रोत्साहन योजना
- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेची सुरुवात
- प्रोत्साहन योजनेंतर्गत पेटंटसाठीच्या खर्चाची जबाबदारी विद्यापीठाने उचलली
- पेटंटसाठी प्राध्यापकांना प्रवृत्त करण्यासाठी विद्यापीठात कार्यशाळा
- पेटंटचा व्यावसायिक स्वरुपात वापर व समाजाच्या हितासाठी वापराची विद्यापीठाची भूमिका